# अस्लम इनामदारची पलटन यू मुंबावर पडली भारी! पुणेरी पलटनचा ४०-२२ ने दमदार विजय

जयपूर,१८ सप्टेंबर २०२५: प्रो कबड्डी लीग स्पर्धेतील १२ व्या हंगामातील ४० वा सामना पुणेरी पलटन आणि यू मुंबा या दोन्ही संघांमध्ये पार पडला. महाराष्ट्रातील दोन्ही संघांमध्ये जोरदार लढत पाहायला मिळाली. पण शेवटी अस्लम इनामदारचा पुणेरी पलटनचा संघ सुनिल कुमारच्या यू मुंबावर भारी पडला. हा सामना पुणेरी पलटनने ४०-२२ च्या फरकाने आपल्या नावावर केला.

जयपूरच्या एसएमएस इनडोअर स्टेडियममध्ये पार पडलेल्या या सामन्यात पुणेरी पलटनचा संघ बचावात आणि चढाईतही आघाडीवर राहिला. पुणेरी पलटनकडून स्टूअर्ट सिंगने सर्वाधिक ८ गुणांची कमाई केली. तर गुरदीपने ५ गुणांची कमाई केली. तर यू मुंबाकडून अलिरेझाने ६ गुणांची कमाई केली.

या सामन्याच्या सुरूवातीला पुणेरी पलटनकडून अस्लम इमानदार पहिली चढाई करण्यासाठी आला. पण यावेळी त्याला खातं उघडता आलं नाही. पण बचावात पुणेरी पलटनने मजबूत पकड करत १ गुण घेतला आणि संघाचं खातं उघडलं. यू मुंबाला तिसऱ्या मिनिटापर्यंत खातं उघडता आलं नव्हतं. अलिरेजाने १ गुण घेत यू मुंबाला खातं उघडून दिलं. सुरुवातीचे ५ मिनिटे पूर्ण झाल्यानंतर पुणेरी पलटनचा संघ ४-२ ने आघाडीवर होता. महाराष्ट्राच्या दोन्ही संघांमध्ये सुरूवातीच्या १० मिनिटात बरोबरीची लढत रंगली. दोन्ही संघ ५-५ गुणांनी बरोबरीत होते. सामन्यातील १३ व्या मिनिटापर्यंत दोन्ही संघ ६-६ ने बरोबरीत होते. त्यावेळी पुणेरी पलटनने सुपर टॅकल करत २ गुणांची आघाडी घेतली.

पुर्वार्धातील १५ व्या मिनिटाला पुणेरी पलटनने ही आघाडी १०-६ वर पोहोचवली. पुर्वार्धातील सुरुवातीच्या २० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर  पुणेरी पलटनचा संघ १५-१० गुणांसह ५ गुणांनी आघाडीवर होता. मुख्य बाब म्हणजे संघाचा कर्णधार अस्लम इनामदार बराच वेळ बाहेर होता. असं असतानाही पुणेरी पलटनने आपली आघाडी कायम ठेवली होती.

उत्तरार्धातील पहिल्याच चढाईत पुणेरी पलटनने सुपर टॅकल करत दमदार सुरुवात केली. पुणेरी पलटनवर ऑलआऊट होण्याचं संकट ओढावलं होतं. पण पलटनच्या बचावपटूंनी सुपर टॅकल करत गुणसंख्येत भर घातली. उत्तरार्धात यू मुंबाने पुनरागमन करण्याचा पूर्ण प्रयत्न केला. पण, पुणेरी पलटनला आपली आघाडी कायम ठेवण्यात यश आलं. सामन्यातील शेवटची १० मिनिटे शिल्लक असताना पुणेरी पलटनने २३-१५ गुणांसह आपली आघाडी कायम ठेवली. शेवटची ६ मिनिटे शिल्लक असताना पुणेरी पलटनने सहाव्यांदा सुपर टॅकल करत संघाची आघाडी १० गुणांवर पोहोचवली. शेवटच्या २ मिनिटात पलटनकडे ११ गुणांची आघाडी होती. सामन्यातील शेवटच्या मिनिटाला यू मुंबांचा संघ पहिल्यांदाच ऑलआऊट झाला. यासह पुणेरी पलटनने आघाडी ३५-२१ गुणांवर पोहोचवली. हा सामना पलटनने ४०-२२ च्या फरकाने जिंकला.